देशोन्नती

आप्पास्वामी महाविद्यालयात सामाजिक शास्त्रेअभ्यास मंडळाचे उद्घाटन

देशोन्नती वृत्तसंकलन...

वाशिम ■ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठद्वारा संलग्नित आणि आप्पास्वामी शिक्षण संस्था शेंदूरजना अढावद्वारा संचालित आप्पास्वामी महाविद्यालय शेंदुरजना अढाव येथे २९ ऑगस्ट रोजी सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळ उद्घाटन समारंभ व क्रीडा दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. सामाजिक शास्त्रे या अभ्यास मंडळा अंतर्गत इतिहास,राज्यशास्त्र व अर्थशास्त्र या तीन विषयाच्या अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली.

या उद्घाटन समारंभाच्या कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा व आप्पास्वामी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कर्मयोगी स्वर्गीय नामदेवरावजी काळे यांच्या प्रतिमा पूजनाने व दिप प्रज्वलीत करून करण्यात आली. या कार्यक्रमा प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.व्ही. मुंडे हे उपस्थित होते तर कार्यक्रमाचे उद्घाटक धाबेकर महाविद्यालयाचे प्राचार्य तथा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई हे उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. तसेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ इतिहास अभ्यास मंडळाचे सदस्य प्रोफेसर डॉ. कैलास गायकवाड हे या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्रशासक तथा माजी प्राचार्य डॉ. एच.आर. तिवारी हे प्रमुख उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळ उद्घाटनाचे निमित्ताने आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानातून प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांनी विद्यार्थ्यांनी स्वतःला ओळखण्याची क्षमता निर्माण करून समाजाचा विकास साधण्याचे आवाहन केले. तर प्राचार्य कैलास गायकवाड यांनी विद्यार्थ्यांनी समाजाभिमुख कार्य करण्यासाठी या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून कार्य करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी बोलताना प्रशासकीय अधिकारी डॉ. तिवारी यांनी सामाजिक शास्त्र विभागाने पूर्वीचे गत वैभव निर्माण करावे तसेच इतिहासाची पुनरावृत्ती करण्याची ताकद विद्यार्थ्यांमध्ये आहे ती त्यांनी ओळखावी असे आवाहन या प्रसंगी केले. प्राचार्य डॉ. टी.व्ही.मुंडे यांनी विद्यार्थ्यांनी स्वतः मधील भावना, चेतना व जाणिवा जागृत करून समाज विकासाचे कार्य निरंतर करावे आणि या अभ्यास मंडळाच्या माध्यमातून समाज विकाससाठी अग्रेसर राहावे, असे आवाहन केले. या कार्यक्रमात मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त क्रीडा दिनाचे आयोजन करण्यात आले होते. शारीरिक शिक्षण संचालक सतीश काळे यांनी मेजर ध्यानचंद आणि त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला. प्रोफेसर डॉ. गजानन मुंदे, उपप्राचार्य तथा इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.बी. एस. कव्हर, ग्रंथपाल प्रवीण पाटील, इतिहास विभाग प्रमुख डॉ.ए. आर. बोरकर, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.व्ही. बी.भिसे, वरिष्ठ लिपिक सुधीर अढाव, अमोल काळे, अनिल राठोड, जगदीश आमटे, दत्तात्रय सावंत, आकाश पाटील, प्रदीप काळे, राजू वानखडे, विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.कु. एस. पी. मनवर यांनी केले. संचालन डॉ. बोरकर यांनी तर आभार डॉ.कु. भिसे यांनी व्यक्त केले.

पंचायत समिती सभागृहात गणेशोत्सव नियोजन व शांतता कमेटीची बैठक संपन्न

देशोन्नती वृत्तसंकलन...

मंगरुळपीर ■ येथील पं.स. सभागृहात गणेशोत्सव नियोजन व शांतता कमेटीची बैठक उत्साहात पार पडली.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी अप्पर पोलीस अधीक्षक गोरख भामरे तर प्रमुख पाहुणे यशवंत केडगे व तहसीलदार शीतल बंडगर, ठाणेदार सुनिल हूड, न. पं. मुख्याधिकारी प्रणव तांबे, गटशिक्षणाधिकारी अवगण, नायब तहसीलदार रवी राठोड, वैद्यकीय अधिकारी अजमल खान, आरोग्य निरीक्षक राजेश राऊत वीज सहाय्यक अभियंता क्षीरसागर, मान्यवर उपस्थित होते. यावेळी अध्यक्षीय भाषणात भामरे म्हणाले,आगामी गणेशोत्सव शांततापूर्ण वातावरणात पार पाडून पोलीस विभागास सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. गणेशोत्सव शांततेत व उत्साहात पाडण्यासाठी सर्व गणेश मंडळ पदाधिकारी यांनी जबाबदारी घेऊन पोलिस विभागाला सहकार्य करावे यावेळी माजी नगराध्यक्ष विरेंद्रसिह ठाकूर, रामकुवर रंघुवंशी, शमशोद्दिन जहागीरदार, सुनिल मालपाणी, वनमाला पेंढारकर,अस्विनी अवताडे, सौरभ सपकाळ, आदी मान्यवर उपस्थित होते.

पाहिजेत
गॅस एजंसीचा अनुभव असलेल्या कॉम्प्युटर ऑपरेटर ची आवश्यक्ता (जागा १)
संपर्क
चिंतलागे इन्डेन मंगरुळपीर
९६०४८१५३५७

लोकमत

आप्पास्वामी महाविद्यालयात सा. शास्त्र अभ्यास मंडळ स्थापन

मानोरा : शेंदूरजना (अढाव) येथील आप्पास्वामी महाविद्यालय दिनांक २९ ऑगस्ट रोजी सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळ उद्घाटन व क्रीडा दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला.

सामाजिक शास्त्रे या अभ्यास मंडळा अंतर्गत इतिहास,राज्यशास्त्र व अर्थशास्त्र या तीन विषयाच्या अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. सुर्वप्रथम संत गाडगेबाबा व आप्पास्वामी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. नामदेवरावजी काळे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.व्ही. मुंडे होते. उद्घाटक म्हणून शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ. कैलास गायकवाड,माजी प्राचार्य डॉ. एच.आर. तिवारी हे उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. टी.व्ही.मुंडे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी स्वतः मधील भावना, चेतना व जाणिवा जागृत करून समाज विकासाचे कार्य निरंतर करावे आणि या अभ्यास मंडळाच्या माध्यमातून समाज विकासासाठी अग्रेसर राहावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. या कार्यक्रमात मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त क्रीडा दिनाचे आयोजन करण्यात आले होते. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. सतीश काळे यांनी मेजर ध्यानचंद आणि त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला. याप्रसंगी सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाची कार्यकारणी घोषित करण्यात आली. कार्यक्रमास प्रा. डॉ. गजानन मुंदे, उपप्राचार्य प्रा. डॉ.बी. एस. कव्हर, ग्रंथपाल प्रवीण पाटील, प्रा. डॉ. ए.आर. बोरकर, प्रा. डॉ.व्ही. बी.भिसे, वरिष्ठ लिपिक सुधीर अढाव, अमोल काळे, अनिल राठोड, जगदीश आमटे, दत्तात्रय सावंत, आकाश पाटील, प्रदीप काळे, राजू वानखडे यांची उपस्थिती होती. डॉ. एस. पी. मनवर यांनी केले. डॉ. बोरकर यांनी संचलन केले. डॉ. भिसे यांनी आभार मानले. (वा.प्र)

Hello Washim
Page No. 2 Sep 01, 2022
Powered by: erelego.com